# प्रकरण ६ वे

# उपसंहार

# प्रकरण ६ वे

# उपसंहार

प्रा. व. बा बोधे यांच्या 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनासंबंधीच्या पहिल्या पाच प्रकरणांतून केलेल्या अभ्यासाचा गोषवारा प्रस्तुत उपसंहार या प्रकारणातून देत आहे. प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणामध्ये चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथा व आत्मकथन या वाङ्मयप्रकारांच्या स्वरूपाचा विचार करून आत्मकथनाचे वेगळेपण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

चरित्र लिहिण्याची परंपरा फार पूर्वीपासून मराठी साहित्यामध्ये रूढ झालेली असून चरित्रातून एका व्यक्तीने दुसऱ्या असामान्य व्यक्तीच्या जीवनकार्याचा आढावा घेतलेला असतो. स्वत:चे चरित्र स्वत:ला लिहिता येत नाही. म्हणूनच एका व्यक्तीचे चरित्र कोणीही आणि कितीही वेळा लिहू शकतो. ज्या व्यक्तीला चरित्र लिहावयाचे आहे, त्या व्यक्तीला चरित्र नायक ही व्यक्ती जशी भावलेली असेल त्याचप्रकारे तो चित्रित करण्याचा प्रयत्न करीत असतो. 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या न्यायाने चरित्र व्यक्ती प्रत्येकास वेगवेगळी भावते. त्यामुळे तर एकाच व्यक्तीवर अनेकांनी लिहिलेल्या चरित्रामध्ये फरक पडत असतो. चरित्रकाराला ज्या व्यक्तीवर चरित्र लिहावयाचे असते. त्या व्यक्तीच्या जीवनातील सर्वच घटना माहीत नसतात. चरित्रकाराने असेच कोणत्यातरी व्यक्तीच्या तोंडून किंवा कोणत्या तरी पुस्तकामध्ये वाचलेले असते. त्यामुळे चरित्रामध्ये व्यक्तीच्या जीवनामध्ये घडलेले प्रसंग जसेच्या तसे येणे शक्य नाही. थोडक्यात चरित्र नायक चरित्रकाराला जसा भावलेला असेल तशाच प्रकारे तो चित्रित करत असतो.

आत्मचरित्र हे स्वत:च स्वत:चे लिहावयाचे असते. आत्मचरित्र हे आयुष्याच्या उत्तरार्धात म्हणजे जीवनाच्या अखेरच्या टप्प्यामध्ये लिहिले जाते. सर्वसामान्य व्यक्तींपासून ते प्रतिष्ठित व्यक्तीपर्यंत कोणीही आत्मचरित्र लिहू शकते. आत्मचरित्रकार स्वत:च्या आयुष्यातील घटनांच्या आधारे लेखन करीत असतो. आत्मचरित्राचे लेखन स्वत: व्यक्ती करीत असल्यामुळे चरित्रापेक्षा आत्मचरित्र अधिक विश्वसनीय ठरलेली आहेत. व्यक्तीच्या जीवनामध्ये घडलेले प्रसंग चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला असतो.

आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीच्या कर्तृत्वाचा आलेख जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात गतजीवनाचा मांडलेला आलेख होय. आत्मचरित्र म्हणजे एका अर्थाने स्वत:चा आत्मशोधच असतो. स्वत:कडे ज्याला तटस्थपणे पाहता येते तोच आत्मचरित्र लिहू शकतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

थोडक्यात आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीने जीवनामध्ये घेतलेल्या 'स्व' अनुभवांचा जीवनाच्या संध्याकाळी घेतलेला आढावा होय.

आत्मकथन हा वाङ्मयप्रकार अगदी स्वातंत्र्योत्तर काळात प्रकाशात आला. दलित सहित्यिकांनी मराठी वाङ्मयात आत्मकथन, आत्मकथा हा वाङ्मयाप्रकार रूढ केलेला आहे. आत्मकथा, आत्मकथन व स्वकथन म्हणजे स्वत:च्या जीवनाच्या ऐन तारुण्यात स्वत:च स्वत:च्या जीवनाचा अधोरेखित केलेला जीवनपट असतो. आत्मकथन म्हणजे दैनंदिन जीवन जगताना आलेल्या सुखदु:खात्मक प्रसंगांचा मांडलेला इतिहास म्हणावा लागेल. आत्मकथनातून विशेषत: दारिद्र्याचे चित्रण येताना दिसते. आत्मकथन हा वाङ्मयप्रकार जीवनाच्या मावळतीला लिहावयाचा नसून जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर हाताळला जाऊ शकतो.

आत्मकथा आणि आत्मकथन यांतील साम्यभेद मांडून आत्मकथनाची सर्वसामान्य वैशिष्टये प्रस्तुत प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय साठोत्तरी मराठी आत्मकथनाची वाटचाल मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणात व. बा. बोधे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झालेली आहे ते मांडत असताना प्रथमत: त्यांचे लौकिक जीवन, जन्म, बालपण, शिक्षण, सामाजिक कार्य त्याचबरोबर वाङ्मयीन वाटचाल आणि त्यांनी कोणकोणते साहित्यप्रकार हाताळले याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. व. बा. बोधे यांनी आजपर्यंत कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, ललित गद्य अशा विविध वाङ्मयप्रकारातून लेखन केले आहे. तसेच 'जत्रा' या साप्ताहिकातून धारावाहिक पद्धतीने कादंबरी लेखन केले आहे. आज त्यांच्या वाङ्मयकृतींची संख्या शंभराहून अधिक आहे. बोधे यांना मराठी ग्रामीण कादंबरीकार म्हणून महाराष्ट्राचा वाचक ओळखतो. त्यांनी निर्माण केलेले साहित्य लोकरंजन करते. बोधे यांना बालपणापासून वाचनाचे वेड असल्याने व त्यांच्यातील प्रतिभेमुळे हळूहळू लिहू लागले. बोधे यांच्या कथा या स्वअनुभवातून साकारलेल्या आहेत. त्यांची भाषा ही ग्रामीण बोलीभाषा आहे. ते स्वत: कथेविषयी म्हणतात, "लहान वयात अनुभवलेल्या अस्वस्थ करणाऱ्या स्वानुभवाची सातारी बोलीत केलेली मांडणी म्हणजे कथा." त्यांना आलेले अनुभवविश्व त्यांनी कथेतून चित्रित केलेले आहे.

बोधे यांनी कादंबऱ्यांमधून सातारा परिसरातील ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आपल्या साहित्यातून घडवलेले आहे. त्याचप्रमाणे सातारा परिसरात येणारा भटका समाज व त्यांचे जीवन याचे

चित्रण कादंबरीतन वास्तव स्परूपात मांडलेले आहे. त्याचबरोबर स्वत:चे अनुभव त्यांनी आत्मकथनातून मांडले आहेत. त्यांनी ललित गद्याचे लेखन परिणामकारकपणे केलेले आहे. त्यात त्यांनी 'चंदन बटवा' यातून आईचे वर्णन अत्यंत चांगल्या रीतीने केले आहे. एकूणच बोधे यांचे साहित्यहे ग्रामीण जीवनाशी निगडित असून त्यात ग्रामीण शब्दांची, म्हणींची, वाक्प्रचारांची, लोकगीतांची चपखल योजना केलेली आहे.

या प्रकरणातून त्यांच्या महत्त्वाच्या कलाकृतीचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय त्यांच्या सहित्यसंवदेचा नामनिर्देश केलेला आहे.

प्रकरण तीनमध्ये 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनाचा आशय अभिव्यक्तीचे स्वरूप इ. अंगाने मांडणी केलेली आहे.

'कोकरउड्या' या आत्मकथनात बोधे यांनी जन्मापासून ते प्राध्यापक होईपर्यंतचा सर्व जीवनपट चित्रित केलेला आहे. त्यामध्ये त्यांना कराव्या लागलेला जीवन संघर्ष, भोगावे लागलेले दु:ख, त्यांनी प्रामाणिकपणे मांडले आहे. स्वत:च्या वाट्याला आलेले दु:ख स्वत: भोगलं असून त्यातून मार्ग काढून शिक्षण पूर्ण केले. परंतु दु:खाचा पाढा मात्र कुणासमोर वाचला नाही. एकूणच 'कोकरउड्या' म्हणजे बोधे यांच्या जीवनाची करुण कहाणी म्हणावी लागेल.

'रानपालखी' या आत्मकथनात २६ जुलै १९७६ ते २००३ पर्यंतचा पंचवीस वर्षांचा कालखंड चित्रित केला आहे. त्यात त्यांना आलेले अनुभव, भेटलेली माणसे, त्याचबरोबर त्यांची वाङ्मयीन वाटचाल याचे दर्शन रानपालखीतून झाले आहे. या आत्मकथनांचा आशय प्रस्तुत प्रकरणात मांडला आहे.

चौथ्या प्रकरणात 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनातील व्यक्तिरेखांचा परिचय करून दिला आहे. 'कोकरउड्या' या आत्मकथनात चरित्र नायकाशिवाय हौसा ही प्रभावी व्यक्तिरेखा आहे. हौसा ही नायकाची आई आहे. ती कष्ट करून आपल्या मुलांना मोठे करते, शिकवते. तिच्या अंगी कष्ट करण्याची जिद्द होती म्हणूनच तिने मुलांना शिकवले. तिला सासरी जाच होता. तरीही त्यावरती स्वत: मार्ग काढते. स्वत:चा नवरा संसारात लक्ष देत नाही तरी त्याच्यावरती तिची निष्ठा आहे. बाबासाहेब हे या आत्मकथनातील छंदीफंदी व्यक्तिरेखा आहे. त्यामुळे वसंताच्या घरावरती गरिबी येते.

कोकरउड्याचा नायक हा दारिद्रयाशी झुंज देताना दिसतो. प्रकाश ही व्यक्तिरेखा नायकाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा होय. या आत्मकथनील व्यक्तिरेखा या आत्मकथनाची उंची वाढवतात. 'रानपालखी' या आत्मकथनातील प्रभावी व महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा ही नायकाची आहे. त्याचा अनेक व्यक्तीशी संबंध आलेला आहे. परंतु ठरावीक व्यक्तींचा परिचय येथे दिला आहे. त्यात हौसा ही व्यक्तिरेखा लेखकाला कायम आधार देण्याचे कार्य करते. तिच्या अंगी कष्टाळूपणा, प्रामाणिक, स्वाभिमानी, पतिनिष्ठा, त्याचबरोबर रानमातीत काम करणारी अशी अनेक रूपे तिच्यात एकवटलेली आहेत.

बाबासाहेब ही व्यक्तिरेखा छांदिष्ट स्वभावाची असून स्वत: मौजमजा करणे अशा वृत्तीची आहे. त्यांना वाचनाचा छंद होता. त्याचबरोबर मटका खेळणे, दारू पिणे, प्रसंगी मुलांना सुद्धा फसविणे. अशा महत्त्वाच्या  व्यक्तिरेखांचा परिचय प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

पाचव्या प्रकरणात 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन केलेले आहे. 'कोकरउड्या व रानपालखी' यांचा साहित्यकृती म्हणून वेगळा विचार करणे आवश्यक ठरते. आत्मकथनाच्या लेखनासाठी लेखकाने स्वत:ची भाषा वापरलेली आहे. कारण कोणत्याही लेखकाने स्वत:च्या बोलीभाषेतून आपले विचार, अनुभव मांडले तर ते अधिक प्रभावीपणे मांडता येतात. त्यादृष्टीने आत्मकथनातील येणारी भाषा स्वाभाविक वाटते. आत्मकथनात आलेली भाषा ही सातारी वळणाची आहे. आत्मकथनामध्ये चित्रमय शैलीचाउपयोग केला आहे. चित्रमय शैली म्हणजे प्रसंगाचे वर्णन वाचताक्षणी त्या त्या प्रसंगाचे चित्र जीवंतपणे डोळ्यासमोर उभे राहते. उदा. मनगटागत ताट. आत्मकथनाच्यानायकाचे माणसांवर, निसर्गावर, गावातील लोक आणि पशुप्राण्यांवर प्रेम आहे. त्याचबरोबर गावाच्या भल्यासाठी, गावातील यात्रेसाठी पुढे धावण्याची भावना त्यांच्या मनात आहे.

'कोकरउड्या' या आत्मकथनाचा वाङ्मयीनदृष्ट्या विचार करत असताना पारंपरिक मूल्यांपेक्षा वेगळ्या मुल्यांच्या आधारे विचार करावा लागतो. जातीने मराठा असूनसुद्धा दलितांप्रमाणे जीवन वसंताच्या वाट्याला आले याचे चित्रण प्रथमच आत्मकथनात आले आहे. 'कोकरउड्या' या आत्मकथनातून लेखकाची सर्वांग रडकथाच आहे. लेखकाचा जन्मच दारिद्रयात झाल्याने ते त्याच्या पाचवीलाच पुजले गेले. त्यांना भोगाव्या लागलेल्या याताना त्यांनी अत्यंत स्पष्ट व तटस्थपणे मांडलेल्या आहेत. त्यात कोणताही भाग लपवला नाही. सर्व प्रसंग प्रांजळपणे मांडलेले आहेत. या आत्मकथनांची भाषा साधी सोपी तितकीच सुटसुटीत आहे. 'कोकरउड्या'त सुरुवातीची भाषा ग्रामीण नंतर थोडी

बदलली. 'रानपालखी'ची भाषा ही नागर व बोलीभाषा अशा संमिश्र स्वरूपाची असून त्यात काही पारिभाषिक शब्दांचा शिरकाव आढळतो.

आत्मकथनातील संवाद हे खटकेबाज तसेच भडक व प्रश्नार्थक स्वरूपाचे असून स्थल-कालानुसार बदलते आहेत. आत्मकथनातील प्रसंगवर्णन प्रसंगानुरूप असल्याने आशय समजण्यास मदत होते. आत्मकथनातील वातावरणनिर्मिती करताना लेखकाने योग्य अशा तंत्राचा उपयोग साधला आहे. आत्मकथनात आलेली निसर्गवर्णने ही वर्णनासाठी वर्णन आलेली नसून सहजपणे परंतु परिणामकारक आहेत. हे लेखकाच्या लेखनाचे विशेष म्हणावे लागेल. त्याचबरोबर आत्मकथनात आलेली प्राण्यांची वर्णने आत्मकथनांची उंची वाढवतात. ग्रामीण भागातील म्हणी, वाक्‌प्रचार, उपमा यांचा यथायोग्य वापर झाल्याने संवादास बळकटी येण्यास मदत झाली आहे.

आत्मकथनातून काही लोकगीतांचा, त्याचबरोबर मराठी चित्रपटातील गीतांचा समावेश असल्याने आत्मकथनास रंजकता आलेली आहे. ही आत्मकथने इतर आत्मकथनांच्या तुलनेत वेगळी आहेत असे म्हणता येईल. दोन्ही आत्मकथनाची शीर्षके सूचक आहेत. त्यातील आशयाशी पूर्णपणे सुसंगत वाटतात. मुखपृष्ठावरील चित्राचा विचार करता ती सुद्धा बोलकी व आशयाशी सुसंगत आहत. अशा प्रकारे 'कोकरउड्या व रानपालखी' यांचा अभ्यास वरील पाच प्रकरणांत मांडला आहे. त्याचबरोबर काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहे.

-----x-----